# झाडीबोलीतील उखाण्यातील कृषीदर्शन

**प्रा.डॉ.सौ. वैशाली गभने (सुरकार)**
सहाय्यक प्राध्यापक,
(लक्ष्मीबाई कला व विज्ञान महाविद्यालय,
मांगली (खापा), त. तुमसर, जि. भंडारा)
शिक्षक कॉलोनी, तकीया वार्ड, भंडारा
E-mail : dr_gabhane@reiffmail.com
मो.क्र.: 9423640251, 9370199246

**सारांश :—**

विदर्भातील झाडीपट्टी म्हणून ओळखला जाणारा भाग म्हणजे अतिपूर्वीचे चार जिल्हे म्हणजेच भंडारा, चंद्रपूर, गोंदिया व गडचिरोली. या भागातील बोलली जाणारी भाषा म्हणजे झाडीबोली, झाडीबोलीला त्या अर्थाने विशेष महत्व आहे. या बोलीतील येणारे शब्द येथील लोकं माणसात जिव्हाळ्याचे वाटतात. येथील प्रामुख्याने केला जाणारा व्यवसाय म्हणजे शेती, त्यातील झाडीचे दर्शन प्रामुख्याने घेतले जाणारे पीक म्हणजे 'भात' व त्याखालोखाल ऊस.

झाडीबोलीतील उखाण्याव्दारे कृषीक्षेत्राशी संबंधीत विविध घटक जसे नांगर, बंडी, बैल, खार, चिलीम, घराचे कवेलू, मोर, पाखडणे, पेरणे या सारख्या घटकाद्दल उखाण्याव्दारे सुंदर दर्शन केलेले नाही.

सदर संशोधन लेखात झाडीबोलीतील उखाण्यात आढळणाऱ्या कृषी विषयक घटकाचा परामर्श घेण्याचा प्रयत्न लेखिलेने केला आहे.

**प्रस्तावना :—**

झाडीपट्टीतील उखाणे म्हणजे येथील मानवी जीवनाचा सांस्कृतीक ठेवाच म्हणावा लागेल. बोलीच्या विविध पैलू प्रमाणे उखाणे हा प्रकारही तितकाच मजेदार आणि ज्ञानसंग्रही. अगदी सहजतेने मानवी मावर विशेषत: तया मनाला भावणारा हा या बोली पेशातील भाषाशैली प्रकार. शेती हा प्रमुख व्यवसाय असणाऱ्या या भागात स्त्री व पुरुष दोन्ही भाग गुंतलेले, शेतीच्या कामात उपयोगी पडणाऱ्या वस्तु, निसर्गातील विविध घटकांचा येणारा सोपा संबंध यातून सहजपणेच उत्खन्नाच्या स्वरुपात घडणारे दर्शन झाल्या भावनू जाते. शेतीची कामे आटोपल्यानंतर विरंगुळा करुन येथील लोकजीवन आपल्या विशेष शैलीत उखाण्याच्या स्वरुपात ज्ञानरंजनही होत असते.

शेती हा या परिसरातील लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. स्वकर्तुत्वाने निर्मिलेल्या तलावांच्या पाण्याचे योग्य नियोजन करून पाटाच्या साह्याने पाणी शेतीत पोहचविले जाते. या पाण्याचा अधिकाअधिक उपयोग करून भात व ऊस यांचे उत्पन्न घेण्यात येते. त्याकरीता तो आपल्या ऊसवाडीला मोटेने पाणी देत असतो. याविषयी उखाणा असा—

इकुन जात गदोगदो, तिकुन येतो थिर् /
रस्त्यावर पल्ल्, बावन् विर

**स्पष्टीकरण —** इकडून वेगाने जाते, तिकडून हळूहळू येते, वाटेत बावन वीर पडतात —

मोट विहीरीत जातांना किती वेगाने असते ! परंतु पाण्याचे भरलेली मोट वर येतांना तिचा वेग कमी होतो आणि ती उघडी झाल्यावर खाली लोटलेले पाणी पाहून रस्त्यावर पडल्ले बावन विरांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

शेतकऱ्याला शेती करतांना विविध औजारांची गरज पडते. त्या औजारांविषयी विविध साधना विषयी सुध्दा उखाणे झाडी बोलीत आहे.

उदा. – प्रश्न अरि रत्तार/नवऱ्या माज्या भऱ्तारा/

आन्दि मुतु दया/मडग काम् करा/

उत्तर – हरि (माझ्या पतीदेवा, आधी लघवी करू द्या. नंतर काम करा – गहू पेरण्याचा हरी)

प्रश्न किडिड्ग कोको माति खा/

तिन् गुब्या दहा पा/

उत्तर – नाड्र – बंडल्

(किडिंग कोको माति खाया, तीन ढुंगण आणि दहा पाय – बैल व नांगर)

येथे किडींग कोको नावाच्या पक्ष्याची उपमा नांगरास दिली आहे. पण हा पक्षी माती खातो, त्याला तीन ढूंगण आणि दहा पाय आहेत. नांगर हाकणारे दोन बैल आणि त्यामागचा शेतकरी यांच्या अवयवांचा हा हिशोब आहे.

लहान्सा धुम्मस/

काम कर उम्मस्/

(हातोडा)

लहानसा धुम्मस खूप काम करतो–हातोडा

नवसे नाड्गर तेरासे बइल्/

माजि कला नाई जिक्सिल् त सिदोरि भरलि

बायको नेइन्/नाइ त जिनाभऱ्लि घोडि देइन्/

– नवा नाड्गर – तेऱ्सट् बइल्

नऊशे नांगर, तेराशे बैल, माझी कथा नाही जिंकशील तर शिदोरीसह बायको नेईन.

पहिल्या ओळीत प्रत्यक्ष उखाणा कथन केला आहे, अन्य ओळीमध्ये अट घातलेली आहे. घोडेस्वाराने हा उखाणा घातल आहे. 'उखाणा जिंकला नाही तर शिदोरी घेतलेली तुझी बायको मला होईल, अन्यथा माझी जिनाची घोडी द्यायला मी तयार आहे अशी विचित्र अट येथे घोडेस्वार सांगतो'.

वस्तुत: या उखाण्याचे उत्तर 'नविन नांगर व तिरपा बैल' हे आहे. पण 'से' प्रत्यय वापरून श्लेष निर्माण केल्यामुळे 'वायदा' द्यावा लागना व तो म्हणजे बायको किंवा घोडी हरण्याचा.

त्याचप्रमाणे आपल्या घोडेस्वार बसलेला एक घोडेस्वार पाटलीणबरोबर पुढील संवाद करतो–

आटलयावरचि पाट्लिन्बाइ/

बोत्लिया रस्ता सड्गत नाइ/

बोत्लिचा रस्ता सरकाच् जा/

– घोडी ना मानोस

'बंडी' ही शेतकऱ्याची फार उपयुक्त साधन आहे. झाडीपट्टीत बैलगाडीचे तीन प्रकार आढळतात. पटाकरीता छोटेखानी छेकडा प्रवासाकरीता खाचर. तसेच सर्व साहित्याची ने—आण करण्याकरीता तर बैलगाडी वापरतात तिला झाडीबोलीत 'बंडी' म्हणतात. तर बंडीच्या चाकाला 'भोवरी' हे नाव आहे. बंडीचे आस्कूड मोडणे किंवा भोवरी खणे ही नित्याचीच बाब. हेच पुढील उखाण्यात सांगितले आहे.

इचकल्याचा इन्दन् झाला/
दोइ भोकात्ला मोडून गेला/
इयनि बाइ दे/
सान्दित् आये तो ने/
— भोव्रि

''सारेच बिघडले दोन्ही छिद्रातील मोडले
बहिणीबाई दे''.
''परसबागेत आहे ती ने''.
— गाड्याचे चाक

दोन बहिणींमधील हा थट्टेखोर संवाद आहे. पहिली म्हणते, 'सारेच बिघडले दोन्ही छिद्रातील मोडले तर विहीण बाई दे' तेव्हा विहीण म्हणते, 'सांदीत म्हणजे परसात आहे, घेऊन जा खुशाल'.

शेतकरी शेतात मुठीने बियाणे फेकतो काही दिवसांनी सर्वत्र हिरवळ दिसते. हा शेतकरी जीवनातील दैनंदिन अनुभव होय. पण ढिवर म्हणजे कोळी मुठीत धरून तळ्यात पेरतो ते मात्र बियाणे नसते. तर मासे पकडण्याचे जाळे असते.

तसेच दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या विविध वस्तूसाठी देखील विविध उखाणे झाडी बोलीत रूढ आहे.

आट् लाक्डा नव्वा जु/
माजि कता जिक्लास् त ठिक्/
नाइ त बायूकोचा गवार् तु/
— बाज

(आठ लाकडे, नववे जु, माझी कथा जिंकलास, नाही तर बायकोचा गव्हार तू — खाट)

गत आणि ठावे मिळून आठ लाकडे होतात. मधली इरकलीची काठी मिळून खाटेचा संपूर्ण साज तयार होतो. हा उखाणा जिंकलास नाही तर तू आपल्या बायकोचा गव्हार होशील अशी दाकीद उखाणे विचारणारा देतो.

चिंट्या बोन्दया नेस्लि/
चव्गामन्दि जाउन् बस्लि/
— चिलम

(चिलम चिंध्या नेसली, चौघात जाऊन बसली — चिलीम)

नट्टाफट्टा करून पाहुणे मंडळीत सारेच मिरवतात, पण अंगावर फाटके कपडे पांघरून कोणीच मिरवत नाही. परंतु चार माणसे बसून चिलीम पितात. त्या चिलमीला गुंडाळलेली छापी चिंधीच असते. घराच्या छपरावर अंथरलेला कवेलूच्या संदर्भातील एक उखाणा पहा.

उतानाचा उब्डा/

कता जिक् घुब्डा/

— कवल्

(उताण्यावर उबडे, घुबडा, उखाणा जिंक — कवेलू)

एक कवेलू उताणे असते तर दुसरे उघडे ही कथा जिंकणाऱ्याला 'घुबड' ही शिवी दिली आहे.

बंदुकीविषयी उखाणा पाहू —

कटिन् गा/

लोकन्ड् खा/

तिचा पोरगा उडून जा/

— बनदुक्

(कठिण गाय, लोखंड खाय, तिचे मूल उडून जा/बंदूक)

याशिवाय 'पाखडणे' आणि 'पेरणे' या दोन दैनंदिन क्रियांचा उल्लेख पुढील उखाण्यात येतो.

पकललयांना उड नाइ/

पेरलयांना बाप नाइ

— मिट्

सुपात घेऊन मिठ पाखडायचा प्रयत्न केला तर ते उडत नाही आणि शेतात पेरले तरी उगवत नाही असे ते काय असावे? अर्थातच मीठ

सय्पाक् केलु बानिचा/
पलड्ग् हातर्लु बेनिचा/

तेच् नाइ घरि/

त् कोन् मज्या करि/

— मिट्

**समारोप व निष्कर्ष :—**

झाडीबोलीतील या उखाण्याव्दारे कृषीक्षेत्राशी निगडीत विविध घटकांचा उल्लेख अगदी सहजपणे होतांना दिसते— कोडीरूपात विचारलेले व मनात उत्सुकता निर्माण करणारे प्रश्न उखाणे स्वरूपात एकतांना झाडीबोलीचे भाषावैभव नक्कीच दृष्टिरूपात पडते. यातून विशेषता स्त्रीमनाला विरंगुळा देण्यात व त्यासोबत ज्ञानरंजन करण्यात उपयोगीच पडतांना दिसते.

**संदर्भ :—**

- डॉ. शरद व्यवहारे — लोकवाड्मय : रुप स्वरूप — साहित्य सेवा प्रकाशन — प्र.आ. १९९१—पृ. २०८
- डॉ. हरिश्चंद्र बोरकर — झाडीपट्टीची लोकरंगभूमी — तारा प्रकाशन, साकोली, जि. भंडारा प्र.आ. २००३ पृ. ९५.
- तत्रैव पृ. १०५
- तत्रैव पृ. १०६
- तत्रैव पृ. ११०